ऑगस्ट २००४

# सावधान !

सर्व सहकारी संस्थांबरोबर राज्यातील नागरी ग्रामिण बिगरशेती सहकारी पतसंस्थांच्या १४ ऑगस्ट २००४ पर्यंत वार्षिक सर्वसाधारण सभा झाल्यामुळे, दुसऱ्या टप्प्यात संस्थांना जागृतपणे काम करावे लागणार आहे. परंतु ज्या पतसंस्थांनी मुदतीत वार्षिक सर्वसाधारण सभा घेतल्या नाहीत व मुदतीसाठी निबंधकांकडे यापुर्वीच लेखी विनंती केलेली आहे, त्या सर्वांना सावधानतेचा इशारा देणे आवश्यक आहे. कुठल्याही परिस्थितीत मुदतवाढीसाठी पैशाचा व्यवहार होता कामा नये. सहकार कायद्याप्रमाणे मुदतीसाठी कारणे व येथून पाठीमागचे मुदतवाढीसाठीचे निकष संबंधितांनी पाळण्याची आवश्यकता आहे. ब्लॅकमेलींग करुन पतसंस्थांना घाबरविण्याचे काम थांबविण्याची गरज आहे. **राज्याचे सहकार मंत्री व सहकार सचिव यांनी पतसंस्थांची होत असलेली पिळवणूक थांबविण्यासाठी वेळीच लक्ष देण्याची गरज आहे.** अनेक पतसंस्थांचे नोंदणीकृत पत्ते पतसंस्थांनी कायदेशीररित्या उपविधीमध्ये दुरुस्ती करुन, मंजूर करुन देखील जुन्या पत्यांवर संस्थांची नोंदणी आहे असे दाखवून, त्या पतसंस्थांवर प्रशासक व आवसायाक नेमण्याची जोरदार मोहिम संबंधीत सहकार खात्याच्या अधिकाऱ्यांनी आरंभिली आहे. महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम १०२ (२) च्या अधिकारात कलम १०३(१) अन्वये अवसायक नेमल्यानंतर संबंधित पतसंस्थेला अपिल करण्यावाचून पर्याय राहत नाही. आणि मग अशा परिस्थितीत **ज्यांनी बेकायदेशीरपणे प्रशासकाची किंवा आवसायकाची नियुक्ती केली आहे त्यांचे काय ?** अशा बाबतीत अपिल करताना भरपाई मागणे व त्यासाठी कायद्याच्या चौकटीत राहून आग्रह करणे हे क्रमप्राप्त आहे. परंतु असे जे अधिकारी आपल्या अधिकाराचा गैरवापर करतात त्यांचेवर प्रशासकीय स्तरावर सरकारमधील त्या खात्याचे मंत्री व सहकार सचिव यांनी बडगा उचलण्याची आवश्यकता आहे. अन्यथ: पतसंस्थांना कुठलेतरी खुसपट काढून नोटीसा पाठविणे, पाठविलेल्या नोटीसा रद्द करण्यासाठी खुले आम व्यवहार करणे, इत्यादी बाबी थांबविण्याची गरज आहे. **उपविधी दुरुस्ती, लेखा परिक्षण, शाखा विस्तार, विविध प्रकारच्या चौकशा इत्यादींच्या नावाखाली मांडलेला बाजार हाणून पाडण्याची व कार्यकर्त्यांची निर्भय व अभ्यासक बनण्याची गरज आहे.** लाचार व दलाल लोक ही चळवळ गिळंकृत करण्यासाठी सरसावले आहेत. व मध्यस्थांच्या नावाखाली पतसंस्थांमधील कार्यकर्त्यांचा छळवाद पैसे उकळण्यासाठी चालू आहे. आणि अशा प्रवृत्तीच्या विरोधात आवाज उठविणारे **जे कार्यकर्ते खुलेआम निर्भयपणे पुढे येतात** त्यांना व्यक्तीद्वेषापोटी ते ज्या सहकारी संस्थांमध्ये पदाधिकारी / संचालक म्हणून काम करतात त्या संस्थांना अडचणीत आणण्यासाठी **त्यांच्यावर कलम ७८, ८३, ८८ इत्यादी कलमांचा आधार घेवून कारवाई करण्यासाठी संबंधित यंत्रणा सज्ज झालेली आहे.** परंतू याही परिस्थितीत ज्या **कुंपणांनी शेत खाण्यास सुरुवात केलेली आहे, अशा बाजार बुणग्यांच्या कारवाईला घाबरायचे बिलकुल कारण नाही.**

कार्यकर्त्यांनी उपविधीत अनावश्यक दुरुस्ती, लेखा परिक्षणाचा वरचा वर्ग मिळण्यासाठी अट्टाहास, आर्थिक क्षमता नसताना नविन शाखा उघडण्याचा मोह सोडून देण्याची गरज आहे. कारण हे सर्व अत्यंत परिश्रमपुर्वक कार्यकर्त्यांनी उभे केलेले आहे. जे अधिकारी पतसंस्थांचे कुठलीही परवानगी, निर्णय, आदेश देताना पैशाशिवाय

काम करीत नाही, त्या विरोधात आवाज उठविणाऱ्यांच्या संस्थांना सुड भावनेतून अडचणीत आणतात, त्या सर्वांच्या विरुध्द दंड थोपटल्याशिवाय पर्याय नाही. किंबहूना संबंधितांच्या विरोधात फौजदारी स्वरुपाच्या तक्रारी व लोक आयुक्तांपर्यंत तसेच रिझर्व्ह बँक, नाबार्ड, यांचेकडे सुध्दा आता संबंधितांबद्दल तक्रारी करण्याची गरज आहे. एका एका संस्थेवर तीन – तीन ऑडीटरची नेमणूक पत्रे देऊन बाजार मांडला आहे,कारण ही ४० टक्के कमिशनची करामत आहे. हे संपूर्ण राज्याला व चळवळीतील दिग्गजांना माहीत आहे. तरी सुध्दा हे **पापी लोक सहकारी संस्थावर कारवाईचा आसूड उगारण्यास जराही लाजत नाहीत. घाबरत नाहीत, व त्यांना काही नैतीकताही राहिलेली नाही.** एक एक उदाहरण व प्रकार जाहीरपणे कागदपत्रांसहित राज्यातील करोडो लोकांसमोर वर्तमान पत्राद्वारे प्रसिध्द होवून सुध्दा राज्य सरकार संबंधितांवर का कारवाई करत नाही, या सर्व प्रश्नांची उत्तरे न्यायदेवतेच्याच माध्यमातून मिळवावी लागणार, असाच निष्कर्ष निघेल. एवढे भयानक दुष्कृत्य करणारे लोकच ‘‘ चोर कोतवालको डाटे’’ अशा पध्दतीने वागत आहेत.

म्हणुन पतसंस्थांमधील कार्यकर्त्यांनी कोणालाही, कुठल्याही कारणास्तव एकही दमडा रोख किंवा धनादेशाद्वारे देऊ नये व त्यासाठी अभ्यास, निर्भयपणा, अन्यायाविरुध्द आवाज, आपले अधिकार व कर्तव्य, उपविधी – सहकार कायदा या सर्व बाबींचे आकलन करणे आवश्यक आहे. आणि पतसंस्थांसारखी पवित्र मंदिरे, गिधाडांपासुन वाचविली पाहिजे. व त्यासाठी वरील मंत्र जपला पाहिजे.

मला पुर्णपणे खात्री आहे की, दिवसेंदिवस सहकारातील कार्यकर्ते आव्हाने स्विकारु लागले आहेत. अन्यायाविरुध्द आवाज उठवू लागलेले आहेत व पैसे घेऊन काम करणारे यांना वठणीवर आणण्यासाठी सी. बी.आय / अँटी करप्शन सारख्या यंत्रणेचा आधार घेण्याची मानसिकता कार्यकर्त्यांमध्ये तयार होत आहे. आणि खरे भ्रष्टाचारी व सहकाराचा बाजार मांडणारे आपल्या अधिकाराचा कसा गैरवापर करतात, सुडभावनेने संस्थांना कसे अडचणीत आणतात, हे राज्यातील करोडो जनतेला समजण्याची गरज आहे. आणि ते हळू – हळू परिवर्तन होत आहे. याबद्दल माझ्यासारख्या कार्यकर्त्यांना अशा अन्यायी व जुलमी प्रवृत्तींना रोखण्यासाठी आणखी बळ मिळत आहे.

**जय हिंद ! जय महाराष्ट्र !! जय सहकार !!!**